MHSO200023592022

दाखल तारीख – १७/१०/२०२२
नोंदणी तारीख – १७/१०/२०२२
निकाल तारीख – १२/०९/२०२५
कालावधी - वर्षे महिने दिवस
०२ ११ ०२

## पार्ट 'अ'

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगोला, जि. सोलापूर यांचे न्यायालयात

## (पीठासीन अधिकारीः- श्रीमती पी. आर. कुलकर्णी )

**दि. १२ सप्टेंबर २०२५.**

**नियमीत फौजदारी खटला क्र.४६८/२०२२** **निशाणी क्र.**

सांगोला पोलीस ठाणे गु. र. क्र. - १३१/२०२२

**अभियोग पक्ष** : महाराष्ट्र सरकार तर्फे
सांगोला पोलीस ठाणे,
ता. सांगोला, जि. सोलापूर.

**अभियोग पक्षातर्फे** : सहा. सरकारी अभियोक्ता श्री. मुजावर

**विरुध्द**

**आरोपी** : १. महादेव पांडुरंग गायकवाड,
वयः ४५ वर्षे, धंदाः शेती,
२. सतिश पांडुरंग गायकवाड,
वयः ३८ वर्षे, धंदाः शेती,
३. ललीता महादेव गायकवाड,
वयः ३६ वर्षे, धंदाः शेती, घरकाम,
४. दिपाली सतिश गायकवाड,
वयः ३० वर्षे, धंदाः शेती, घरकाम,
सर्व रा. पवार वाडी, महुद, ता. सांगोला, जि. सोलापूर.

**आरोपी तर्फे** : ॲड. श्री. पी. एल. उबाळे

## पार्ट 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०६/०२/२०२२ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | ०६/०६/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ११/१०/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०३/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय आरक्षीत केल्याची तारीख | ०३/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय तारीख | १२/०९/२०२५ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सुटल्याचा दिनांक | दोषारोप ठेवल्याचे कलम | आरोपी निर्दोष की दोषी ? | शिक्षेचा तपशील | शिक्षेत सुट. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | महादेव पांडुरंग गायकवाड | -- | -- | भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | सतिश पांडुरंग गायकवाड | -- | -- | --"-- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ३. | ललीता महादेव गायकवाड | -- | -- | --"-- | निर्दोष | निरंक | निरंक |
| ४. | दिपाली सतिश गायकवाड | -- | -- | --"-- | निर्दोष | निरंक | निरंक |

## पार्ट 'क'
## अभियोग पक्षाचे साक्षादारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | जयश्री रामचंद्र खंडागळे | फिर्यादी, नि.४२ |
| २. | हर्षद रामचंद्र खंडागळे | नि.४३ |

आरोपीतर्फे पुरावा देण्यात आला नाही. न्यायालयीन साक्षीदारांकडून पुढील पुरावा नाही.

## अभियोग पक्षातर्फे/बचाव पक्षातर्फे/न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी.

**अ. अभियोग पक्ष.**

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ब. बचाव पक्ष.**

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | ४४(१) | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ४४, ४५ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

**क. न्यायालयातर्फे.**

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल | तपशील |
|---|---|---|
| १. | पोलीस ठाणे मालमत्ता नोंदवही क्र.६४/२०२२ | पांढरे रंगाची गोलाकार बादली |

-----------------------------------------------------------------------------------------

## न्यायनिर्णय

(पारित दिनांक १२/०९/२०२५)

आरोपींविरुध्द हा खटला भारतीय दंड संहिता कलम भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की, फिर्यादी जयश्री रामचंद्र खंडागळे ही तिचे कुटूंबासोबत पवारवाडी, महुद, ता. सांगोला, जि. सोलापूर येथे राहणेस आहे. दि.०६/०२/२०२२ रोजी दुपारी ४.०० वा. चे सुमारास फिर्यादीचे तिची भावजय दिपाली सतिश गायकवाड हिचे बरोबर किरकोळ भांडण झाले होते. त्यानंतर सायंकाळी ७.०० वा. चे सुमारास फिर्यादीचा भाऊ सतिश पांडूरंग गायकवाड व महादेव पांडूरंग गायकवाड, दिपाली सतिश गायकवाड, ललिता महादेव गायकवाड हे सर्वजण दुपारी झालेल्या भांडणाबाबत विचारण्यास आले असता त्यावेळी फिर्यादी त्यांना समजावून सांगत असताना दिपाली सतिश गायकवाड व ललिता महादेव गायकवाड या दोघी शिवीगाळी करू लागले. त्यावेळी महादेव पांडूरंग गायकवाड याने फिर्यादीस व तिचा मुलगा हर्षद यास हाताने लाथाबुक्यांने मारहाण करु लागला व सतिश पांडरंग गायकवाड याने तेथेच पडलेली बादली हातात घेवून फिर्यादीचे तोंडावर व पाठीवर मारुन जखमी केले व दिपाली सतिश गायकवाड हिचे कडून फिर्यादीचे गळ्यातील मंगळसूत्र तुटून तेथेच पडून गहाळ झाले आहे. महादेव गायकवाड व सतिश गायकवाड यांनी "तुम्हाला बघून घेतो, तुम्हाला सोड़णार नाही" अशी धमकी दिले. म्हणून फिर्यादीने आरोपींविरुद तक्रार आहे दाखल केली.

३. प्रस्तुत फिर्यादवरुन आरोपींविरुध्द गु.र.क्र.१३१/२०२२ अन्वये भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पो.हे.कॉ. क्षिरसागर/२६४, सांगोला पोलिस स्टेशन यांच्याकडे देण्यात आला. तपासादरम्यान तपास अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा केला, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केला, मुद्देमाल जप्त केला. आरोपींना अटक केली आणि साक्षीदारांचे जबाब नोंदवून तपासाअंती न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाले. आरोपींचे विरुध्द दोषारोप (नि.४२) निश्चित करुन त्यातील मजकूर आरोपींना वाचून व समजावून सांगण्यात आले असता त्यांनी गुन्हा नाकबूल करुन संपरिक्षा चालविण्याची विनंती केली. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये जबाब नोंदवण्यात आले नाही.

५. उभय पक्षांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखाची सखोल शहानिशा केली.

न्यायनिर्णयासाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व कारणमीमांसा खालीलप्रमाणे देत आहेः-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, दि.०६/०२/२०२२ रोजी सायंकाळी ७.०० वाजण्याचे सुमारास मौजे पवारवाडी, महुद बु., ता. सांगोला येथील फिर्यादीचे राहते घराचे समोर आरोपींनी आपसी संगनमताने त्यांचे समान उद्दीष्ट साधणेकरीता फिर्यादीस बादलीने तोंडावर व पाठीवर मारहाण करुन इच्छापूर्वक जबी दुखापत केली? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी संगनमताने त्यांचे समान उद्देश साधण्याकरीता फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्याने मारहाण करुन जखमी केले ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करणेसाठी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ केला, त्यांचा अपमान केला व त्यानुसार त्यास उद्देशून व माहित असताना प्रक्षोभित केले, ज्यामुळे सार्वजनिक शांततेचा भंग किंवा इतर गुन्हा घडू शकला असता ? | नाही. |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करणेसाठी फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ५</u> -**

६. उपरोक्त सर्व मुद्दे हे ऐकमेकांशी संबंधित असल्याने पुराव्याची पूनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे चर्चेकरिता घेतले आहेत. आरोपींवरील आरोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.१ फिर्यादी जयश्री रामचंद्र खंडागळे (नि.४५) यांनी त्यांचे जबाबात असे सांगितले की, ती तिचे पती, एक मुलगा व दोन मुली यांचेसोबत राहते. ती सर्व आरोपींना ओळखते. दि.०६/०२/२०२२

रोजी दुपारी ४.०० व ७.०० वाजता ती कोठे होती हे तीला आठवत नाही. त्यावेळी काय घटना घडली हे तिला आठवत नाही. तिने गैरसमजूतीतून आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीने तिचे फिर्यादवरील सही ओळखून त्यातील मजकूर माहित नसल्याचे सांगितले. घटनास्थळावर तीची सही आहे.

७. साक्षीदार क्र.२ हर्षद रामचंद्र खंडागळे (नि.४३) यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. सदर साक्षीदारास फितूर घोषित करण्यात आले. फिर्यादी व साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसलेने भारतीय पुरावा कायद्यानुसार सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन त्यांना उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. फिर्यादी व साक्षीदार यांनी त्यांचे उलटतपासामध्ये त्यांचेत व आरोपींचेत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे मान्य केले व अभियोग पक्षातर्फे विचारलेल्या इतर सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तर दिले. त्याप्रमाणे फिर्यादी व आरोपींनी निशाणी क्र.४६ कडे तडजोड पुरसीस दाखल केले आहे. सदर पुरसीसचे अवलोकन करता प्रस्तुतचे प्रकरण फिर्यादी व आरोपींचे दरम्यान न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे स्पष्ट होते. अभियोग पक्षाला आरोपींना गुन्हयामध्ये गोवण्याइतपत पुरावा अभिलेखावर आणता आलेला नाही. त्यामुळे आरोपींना दोषी धरण्याइतपत कोणताही सबळ पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही.

८. फिर्यादीने दिलेल्या मौखिक साक्षीचे अवलोकन केले असता फिर्यादीने आरोपींविरुध्द फिर्याद दिली होती, असा निष्कर्ष काढण्याकरिता भरपूर वाव आहे. फिर्यादीने त्याचे उलटतपासात तडजोड पुरसिस प्रमाणे फिर्यादीची आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे देखील मान्य केलेले आहे. त्यामुळे आरोपींचा गुन्हयातील सहभाग सिध्द होत नाही. त्यामुळे उपलब्ध असलेल्या साक्षी पुराव्यावरून भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ चे आवश्यक घटक सर्व शंकांच्या पलीकडे जाऊन सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, उपलब्ध असलेल्या पुराव्याआधारे तसेच उभय पक्षांमधील झालेली तडजोड या बाबींचा विचार करता आरोपींच्या विरोधात निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. त्यामुळे आरोपी

निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दे क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत. उपरोक्त मुद्यांच्या निष्कर्षांवरून आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. ५ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करत आहे.

**– आदेश –**

१. आरोपी क्र.१ महादेव पांडुरंग गायकवाड, आरोपी क्र.२ सतिश पांडुरंग गायकवाड, आरोपी क्र.३ ललीता महादेव गायकवाड, आरोपी क्र.४ दिपाली सतिश गायकवाड यांना भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ३२३ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचा पूर्वीचा जामिन व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपी क्र.१ ते ४ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वयेच्या पूर्ततेसाठी प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा जामिन व जातमुचलका सादर करण्याचे आदेश देण्यात येत आहे.

४. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल पोलीस ठाणे मालमत्ता नोंदवही क्र.६४/२०२२ हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

(खटल्याचा निकाल खुल्या न्यायालयात देण्यात आला.)

सांगोला
दि. १२/०९/२०२५

**( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Civil Judge, J.D. & J.M.F.C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 12/09/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 12/09/2025 |